स्वाध्याय क्र. 1.

# 1. वित्त व्यवस्थापनाची ओळख

प्र.1) अ) खालील दिलेल्या पर्यायांमधून योग्य पर्याय निवडून वाक्य पुन्हा लिहा.

1) वित्त हे पैसे व पैशाचे व्यवस्थापन यांच्याशी निगडित आहे.

2) वित्त म्हणजेच कंपनीच्या आर्थिक बाबींचे व्यवस्थापन करणे.

3) संस्थात्मक वित्तव्यवस्था व्यावसायिक संस्थेने केलेल्या भांडवलाचे संपादन व त्याचा विनियोग या गोष्टींची हाताळणी करते.

4) कंपनीला सरकारकडे कर भरावा लागतो.

5) स्थिर भांडवल म्हणजेच कोणत्याही प्रकारची स्थिर मालमत्ता होय.

6) चालू संपत्तीचे चालू दायित्वावरील आधिक्य म्हणजेच खेळते भांडवल होय.

7) उत्पादन उद्योगाला स्थिर मालमत्ता मिळविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी गुंतवावा लागतो.

8) लोकसंख्या उच्च दराने वाढत असल्यावर काही उत्पादकांना ही व्यवसाय वाढविण्यासाठी संधी आहे असे वाटते.

9) एकूण चालू मालमत्ता म्हणजेच व्यवसायातील खेळते भांडवल.

Scanned with CamScanner

१०) भांडवल संरचना म्हणजे इच्छित प्रमाणानुसार विविध स्त्रोतांचे निधी एकत्र करणे.

ब) जोड्या जुळवा.

| 'अ' गट | 'ब' गट |
| --- | --- |
| १) भांडवली अर्थसंकल्प | अ) गुंतवणुकीचा निर्णय |
| २) स्थिर भांडवल | ब) स्थिर मालमत्ता |
| ३) खेळते भांडवल | क) एकूण चालू मालमत्ता |
| ४) भांडवल संरचना | ड) विविध वित्त स्त्रोतांचे मिश्रण |
| ५) संस्थात्मक वित्तव्यवस्था | इ) भांडवल उत्पादन व त्याचा विनियोग |

क) शब्द किंवा शब्दसमूह किंवा संज्ञा लिहा.

१) कोणत्याही व्यवसाय कार्याच्या यशाचा निर्धारक.
→ वित्त.

२) संस्थेकडे पुरेसे भांडवल असल्याची खात्री देणारा वित्त व्यवस्थापकाचा निर्णय
→ वित्त निश्चितीचा निर्णय.

३) निधीचा यशस्वीरित्या उपयोग करण्याचा वित्तीय व्यवस्थापकाचा निर्णय.
→ वित्त गुंतवणुकीचा निर्णय.

४) दीर्घ कालावधीसाठी वापरली जाणारी स्थिर मालमत्ता मिळविण्यासाठी या भांडवलाची आवश्यकता असते.
→ स्थिर भांडवल.

Scanned with CamScanner

५) चालू मालमत्तेची एकूण बेरीज
→ खेळते भांडवल.

६) चालू मालमत्तेचे चालू दायित्वावरील आधिक्य
→ खेळते भांडवल.

७) कच्च्या (मालमत्तेचे) मालाचे तयार वस्तूमध्ये रूपांतरित करण्याची प्रक्रिया.
→ उत्पादन चक्र

८) अर्थव्यवस्थेतील तेजी व मंदीचे चक्र.
→ व्यवसाय चक्र.

९) एकूण भांडवलातील वेगवेगळ्या प्रतिभूतींचे गुणोत्तर
→ भांडवल संरचना.

१०) वित्त पुरवठा करणारा अंतर्गत स्त्रोत.
→ प्रतिधारण नफा / संचय नफा.

ड) चूक की बरोबर ते लिहा.

१) वित्त हे पैसे व पैशाचे व्यवस्थापन यांच्याशी निगडित आहेत. – बरोबर.

२) प्रकल्प जर फायदेशीर असेल तरच व्यवसायिक (कार्यांमध्ये) संघटना त्याला हिरवा कंदील दाखवते.
– बरोबर.

३) संस्थात्मक वित्तव्यवस्था विविध व्यवसायिक कार्यांमध्ये समन्वय साधते. – बरोबर.

PAGE No.
DATE / /

४) स्थिर भांडवलाला 'अभिसरण भांडवल' असेही म्हणतात
– चूक.

५) खेळते भांडवल व्यवसायामध्ये शक्यतो कायमस्वरूपी
राहते. – चूक.

६) व्यवसायात भाडेपट्टीच्या तत्वावर मालमत्ता संपादन
केल्यास जास्त प्रमाणात निधींची आवश्यकता असते.
– चूक.

७) व्यवसायात चैनीच्या वस्तूंचे उत्पादन व व्यापार
करणाऱ्या व्यवसायास मोठ्या प्रमाणावर खेळत्या
भांडवलाची आवश्यकता असते. – बरोबर.

८) मोठ्या प्रमाणावर व्यवसाय करणाऱ्या कंपनीला अधिक
खेळत्या भांडवलाची गरज असते. – बरोबर.

९) उधारमतवादी पतधोरणांमुळे बुडीत कर्जांची समस्या
उद्भवते. – बरोबर

१०) वित्तीय संस्था व बँका व्यवसायाच्या खेळत्या
भांडवलाची आवश्यकता पुर्ण करतात. – बरोबर

इ) गटात न बसणारा शब्द शोधा.

१) जमीन व इमारत, यंत्रसामग्री, रोख रक्कम.
→ रोख रक्कम

२) स्थिर भांडवल, भांडवल संरचना, खेळते भांडवल.
→ भांडवल संरचना

3) कर्जरोखे भांडवल, समहक्क भाग भांडवल, अग्रहक्क भाग भांडवल.

→ कर्जरोखे भांडवल.

फ) खालील विधाने पूर्ण करा.

1) भांडवलाच्या आवश्यकतेचे प्रारंभिक नियोजन करणाऱ्या व्यक्ती म्हणजेच वित्तीय व्यवस्थापक

2) जेव्हा अर्थव्यवस्थेत तेजी असते तेव्हा विक्रीतही वाढ होते.

3) कच्च्या मालाचे तयार वस्तूंमध्ये रूपांतर करण्याची प्रक्रिया म्हणजेच उत्पादन चक्र होय.

4) मंदिच्या काळात विक्रीमध्ये घट होते.

ग) कंसातील अचूक पर्याय निवडा.

| | गट 'अ' | गट 'ब' |
|---|---|---|
| अ) | वित्तीय निश्चीतीचा निर्णय | 1) भांडवल योग्य प्रमाणात असणे. |
| ब) | स्थिर भांडवल | 2) दिर्घ कालावधी |
| क) | वित्त गुंतवणुकीचा निर्णय | 3) पद्धतशीरपणे निधी असणे. |
| ड) | खेळते भांडवल | 4) अभिसरण भांडवल |
| इ) | विविविध वित्त स्त्रोतांचे मिश्रण | 5) भांडवल संरचना |

PAGE No.
DATE / /

ड) एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) 'संस्थात्मक वित्त व्यवस्था' - व्याख्या लिहा.
→ हेन्री हॉगलंड यांच्या मते, "संस्थात्मक वित्तव्यवस्था व्यवसायिक संस्थेने केलेले भांडवल संपादन व त्याचा विनियोग या गोष्टींची हाताळणी करते.

2) स्थिर भांडवल म्हणजे काय ?
→ दिर्घकालावधीसाठी वापरली जाणारी तसेच विक्रीच्या उद्देशाने न घेतलेली मालमत्ता, खरेदी करण्यासाठी जे भांडवल लागते त्याला 'स्थिर भांडवल' असे म्हणतात.

3) खेळत्या भांडवलाची व्याख्या लिहा.
→ दैनंदिन व्यवसायिक कार्ये पार पाडण्यासाठी आवश्यक असणाऱ्या भांडवलास खेळते भांडवल असे म्हणतात.

4) उत्पादन चक्र म्हणजे काय ?
→ कच्च्या मालाचे तयार वस्तूमध्ये रूपांतर करण्याच्या प्रक्रियेला 'उत्पादन चक्र' असे म्हणतात.

5) 'भांडवल संरचना' - व्याख्या लिहा.
→ भांडवल संरचना म्हणजे इच्छित प्रमाणानुसार विविध स्रोतांचे निधी एकत्र करणे.

Scanned with CamScanner

PAGE No.
DATE / /

ई) खालील वाक्यातील अधोरेखित शब्द दुरुस्त करून पुन्हा लिहा.

1) कर्जरोखे धारकांना लाभांश देण्यासाठी वित्त आवश्यक आहे.

→ कर्जरोखे धारकांना व्याज देण्यासाठी वित्त आवश्यक आहे.

2) जेव्हा अर्थव्यवस्थेत मंदी असते तेव्हा विक्रीमध्ये वाढ होते.

→ जेव्हा अर्थव्यवस्थेत तेजी असते तेव्हा विक्रीमध्ये वाढ होते.

3) 'भाग' हे कंपनीने घेतलेल्या कर्जाऊ भांडवलाची पोचपावती असते.

→ 'कर्जरोखे' हे कंपनीने घेतलेल्या कर्जाऊ भांडवलाची पोचपावती असते.

4) समहक्क भागधारकांना स्थिर दराने लाभांश मिळतो.

→ अग्रहक्क भागधारकांना स्थिर दराने लाभांश मिळतो.

Scanned with CamScanner